स्थापना १९३९
७५
अमृतमहोत्सवी दैनिक
अमृतमहोत्सवी
# पुढारी
प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
सातारा
सोमवार । दि. १२ ऑक्टोबर २०१५ । वर्ष ७७ । मुंबई, पुणे, कोल्हापूर, सांगली, सातारा, ठाणे, रायगड, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, अहमदनगर, नाशिक, सोलापूर, बेळगाव, गोवा येथून एकाचवेळी प्रसिद्ध epaper.p

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगाव

# महाविद्यालयात शिबिर-कार्यशाळांना उत्स्फूर्त प्रतिसाद

## शैक्षणिक जगत

**सातारा : प्रतिनिधी**

सातारा जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांमध्ये शिबिर, कार्यशाळा आदी उपक्रम पार पडले. या कार्यशाळांना विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

### अभयसिंहराजे भोसले तंत्रनिकेतनमध्ये शिबिर

**सातारा : प्रतिनिधी**

शेंद्रे, ता. सातारा येथील अभयसिंहराजे भोसले तंत्रनिकेतनमध्ये 'व्यक्तीमत्व विकास' या विषयावर दोन दिवशीय शिबीर उत्साहात संपन्न झाले. या शिबीरात ऑपरेशन मॅनेजर संदिप जाधव यांनी 'व्यक्तीमत्व विकास आणि सॉफ्ट स्किल' या विषयावर मार्गदर्शन केले. नामवंत कंपनीत प्रमुख पदावर रुजू होण्यासाठी मुलाखत देताना कोणकोणत्या गोष्टींना सामोरे जावे लागते? कोणती तयारी करावी? यावर त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले.

यावेळी तंत्रनिकेतनचे प्राचार्य धुमाळ,उपप्राचार्यनलवडे,कार्यालयीन अधिक्षक भोसले, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

### छत्रपती शिवाजी महाविद्यालयात इंग्रजी विषयावर चर्चासत्र

छ. शिवाजी महाविद्यालयाच्या इंग्रजी विद्यालयातील इंग्रजी विभागाच्यावतीने आयोजित 'रीडिंग फॉर व्हेरीअस पर्पजेस' या विषयावर दोन दिवशीय कार्यशाळा शिवाजी विद्यापिठाचे इंग्रजी विभागप्रमुख डॉ. ए. एल. जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर अध्यक्षस्थानी होते.

चर्चासत्रात इंग्लिश अॅन्ड फॉरीन लॅंग्वेजेस युनिर्व्हसिटी, हैद्राबादचे डॉ. किशोर कुमार यांचे व्याख्यान झाले. डॉ. आशुतोष पोतदार यांनी 'रिडिंग फॉर इस्थेटीक प्लेअर', डॉ. अशोक थोरात यांनी 'रिडिंग थ्रू ई-मीडिया', प्राचार्य डॉ. एम. ए. शेख यांनी 'रिडिंग ऑफ लिटरेचर' या विषयांवर मार्गदर्शन केले. चर्चासत्राचा समारोप प्राचार्य डॉ. अशोक कारंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. प्रा. रामचंद्र पळे, डॉ. एस. एस. घार्गे, प्रा. फुलचंद शिरसट, प्रा. रविंद्र महाजन, प्रा. एम. आर. कांबळे, यांनी चर्चासत्राच्या यशस्वीतेसाठी प्रयत्न केले. समन्वयक प्रा. राजेंद्र तांबिले यांनी आभार मानले.

### डी. पी. कॉलेजमध्ये महिलांसाठी व्याख्यान

महाविद्यालयीन स्तरावरच विद्यार्थिनींना महिला संरक्षण कायद्याची माहितीदिल्यास महिलांवर होणारे अन्याय निश्चित कमी होतील. यासाठी महिलांना कायद्याचे बळ हवे, असे प्रतिपादन अ‍ॅड. माधुरी प्रभुणे यांनी केले.

कोरेगाव येथील डी. पी. भोसले महाविद्यालयामध्ये विद्यार्थिनी विकास मंचच्या वतीने 'महिला संरक्षण कायदा' या विषयावर आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरुन अ‍ॅड. वृषाली बगाडे म्हणाल्या, सध्या महिलांमध्ये भितीयुक्त वातावरण आहे. महिला संरक्षण कायद्याची म्हणावी तशी अंमलबजावणी होताना दिसत नाही. या कायद्याचा गैरवापर होणार नाही याची दक्षता महिलांनी घेतली पाहिजे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक विकास मंचच्या प्रमुख प्रा. सौ. अश्विनी साळुंखे यांनी केले. प्रा. सौ.एस. व्ही. माने यांनी आभार मानले.

### जकातवाडी कॉलेजमध्ये भित्तीपत्रक स्पर्धा संपन्न

जकातवाडी, ता. सातारा येथील यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ सोशल वर्क महाविद्यालयामध्ये मानसिक आजार या विषयावर आधारित भित्तीपत्रक बनविण्याची स्पर्धा संपन्न झाली.

यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थी- विद्यार्थिनींनी याच विषयावर पथनाट्य सादर केले.

### वाय.सी.मध्ये सूत्रसंचलन व निवेदन कला कार्यशाळा

कर्मवीर विद्या प्रबोधिनी व यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स यांच्या संयुक्त विद्यमाने सूत्रसंचलन व निवेदन या विषयावरील तीन दिवसीय कार्यशाळा उत्साहात पार पडली.

कार्यशाळेचे उदघाटन आकाशवाणी केंद्र साताराचे गोविंद मोकाशी यांच्या हस्ते व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. जी. कानडे यांच्या अध्यक्षतेखाली झाले. सातारा आकाशवाणी केंद्राचे कार्यक्रम अधिकारी विक्रांत मंडपे यांनी उच्चार शास्त्र या विषयावर तर तुषार भद्रे यांनी 'आत्मविश्वास व देहबोली', 'श्वासावरील नियंत्रण, वेशभूषा' या विषयावर मार्गदर्शन केले. रेडीओ टोमॅटो एफ. एम. कोल्हापूरचे रेडिओ जॉकी जाहिद बागवान यांनी 'रेडिओवरील संधी आणि आव्हाने' या विषयावर मार्गदर्शन केले.

कार्यशाळेचे नियोजन प्रा. डॉ. बी. टी. जाधव, प्रा. डॉ.संयोगिता वाडिकर यांनी केले. प्रा. विपीन शिंदे, प्रा.नेहा बेंद्रे, प्रा. प्रतिमा पवार, श्रध्दा साळुंखे, प्रा. प्राजक्ता कदम यांनी कार्यशाळेसाठी सहकार्य केले.

### एलबीएसमध्ये म. गांधी जयंती साजरी

लाल बहादूर शास्त्री महाविद्यालयामध्ये राष्ट्रपिता म.गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती प्राचार्य डॉ. राजेंद्र शेजवळ यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात साजरी करण्यात आली.